REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १२ जानेवारी, १९४९ | अंक २


## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ३०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३५,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर








तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**वैमानिक प्रवासाची मौज**—मुंबईतील परदेशीय प्रवासाची व्यवस्था करणाऱ्या एजंटांना टी. डब्ल्यू. ए. ह्या कंपनीनें नुकतेंच गमतीखातर विमानांतून हिंडवून आणलें. विमानांतच एजंटांना खाना देण्यांत आला. शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही प्रकारची सोय करण्यांत आली होती. कंपनी आपल्या प्रवाशांच्या किती सुखसोयी पहाते ह्याची माहिती देण्यासाठींच एजंटांना मुद्दाम फिरवून आणण्यांत आलें.

**मॅन्युफॅक्चरर्स डायरेक्टरी**—ऑल इंडिआ मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन, मुंबई ह्या संस्थेतर्फे हिंदुस्थानांतील उत्पादक कारखानदारांची माहिती देणारा एक संदर्भ ग्रंथ तयार करण्यांत येणार आहे. कारखानदारांनीं आपले पूर्ण पत्ते, करीत असलेला माल, टेलिफोनचा नंबर, केबलचा पत्ता, शाखा, संचालक मंडल, वसूल भांडवल इत्यादी माहिती पुरवावी अशी विनंति करण्यांत आली आहे. माहिती संस्थेच्या मुख्य कार्यालयांत म्हणजे इंडस्ट्रिअल ॲश्युरन्स बिल्डिंग, फोर्ट, मुंबई ह्या पत्त्यावर धाडावयाची आहे.

**मंगलोरला विमानतळ**—दक्षिण हिंदुस्थानांत विमानतळ बांधण्याच्या दृष्टीनें पहाणी करण्याचें काम सध्यां चालू आहे. हिंदुस्थान सरकारचे मुख्य एंजिनिअर मि. माथूर हे सध्यां ह्याच कामासाठीं दौऱ्यावर आहेत. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर जे आणखी विमानतळ बांधण्यांत येतील त्यांत मंगलोरला एक होणार आहे असें समजतें. ह्या तळासाठी जागा मुक्रर करण्यांत आली आहे

**शेती सुधार कमिटीचा अहवाल**—काँग्रेसनें नेमलेल्या शेती-सुधार कमिटीचा अहवाल अध्यक्ष डॉ. पट्टाभि सीतारामय्या ह्यांना मार्च, १९४९ अखेर सादर करण्यांत येईल असें समजतें. निरनिराळ्या प्रांतांत जमीन धारण करण्याच्या कोणकोणत्या पद्धति आहेत, ह्यासंबंधीं माहिती गोळा करण्याचें काम सध्या कमिटी करीत आहे.

**दामोदर नदीवरील धरण**—दामोदर नदीवर धरण बांधून वीज उत्पन्न करण्याच्या योजनेसाठी यंत्रसामुग्रीची मागणी हिंदुस्थान सरकार लवकरच नोंदविणार आहे. ही यंत्रसामुग्री २,००,००० किलोवॅट वीज उत्पन्न करणारी असेल. परदेशाहून यंत्रें ठरल्याप्रमाणें वेळेवर आलीं तर वीज निर्मितीचें केंद्र ४ वर्षांत चालू होईल असा अंदाज आहे.

**मार्शल मदत योजना कोसळणार ?**—अमेरिकन मजूर पक्षाच्या एका सभासदानें मार्शल मदत योजना येत्या दोन वर्षांत कोसळून पडेल असें मत व्यक्त केलें आहे. त्याच्या मतानें युरोपमधील लोकांना मक्तेदार भांडवलाचें वर्चस्व नको आहे. कारण अशा वर्चस्वामुळेंच युरोपिअन जनतेला दोन युद्धें ओढवून घ्यावीं लागलीं; आणि दरम्यानच्या काळांत आर्थिक मंदी आणि नाझी राजवट ह्या संकटांना तोंड द्यावें लागलें.

**आंतरराष्ट्रीय दळणवळणास दुसऱ्या ग्रहाचा आधार**—टेलिफोनचें आंतरराष्ट्रीय दळणवळण चंद्राचेमार्फत होऊं लागण्याचा संभव दिसतो. एका ठिकाणाहून लहरी चंद्रावर आपटून त्यांचा टप्पा दुसऱ्या ठिकाणीं पकडता येण्याची शक्यता शास्त्रज्ञांस वाटत आहे. अशाच प्रकारें टेलिव्हिजनचीहि शक्यता आहे. चंद्र हा दरदिवशीं १२ तासांपेक्षा अधिक वेळ कधींच उपलब्ध होणार नाहीं, ही एक अडचण आहे. लहरी अत्यंत वेगानें प्रवास करीत असल्या, तरी न्यूयॉर्क-पॅरीस बोलण्यास पांच सेकंद लागतील, त्याचीहि अडचण दूर व्हावी लागेल. "व्ही. एच. एफ." लहरींस आभाळांतील व्यत्यय येत नाहीं आणि ह्या लहरींचे असंख्य मार्ग असल्यामुळें एकाच वेळीं अनेक लोकांचें दळणवळण चालू राहूं शकेल. न्यू जर्सी बेल टेलिफोन कंपनीमधील संशोधक मि. डेव्हिस पेज ह्यांनीं ह्या दळणवळणाच्या शक्यतेची माहिती कंपनीच्या 'इंटर नॅशनल रिव्ह्यू'मध्यें प्रसिद्ध केली आहे.

**अमेरिकन मंत्र्यांचे पगार वाढणार**—प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं काँग्रेसला अशी सूचना केली आहे कीं, अमेरिकेच्या मंत्रिमंडळांतील सभासदांचे पगार वार्षिक १५,००० डॉलर्स आहेत, ते २५,००० डॉलर्स करण्यांत यावेत. देशांतील पहिल्या प्रतीचे बुद्धिमान लोक सरकारी नोकरीकडे आकर्षिले जावे म्हणून ही पगारवाढ आवश्यक आहे, असें मि. ट्रूमन ह्यांच्या सल्लागारांचें म्हणणें आहे. मंत्र्यांप्रमाणेंच इतर वरिष्ठ नोकरांचे पगारही वाढविण्याची सूचना करण्यांत आली आहे.

### प्रां. को. कौन्सिलची पहिली बैठक

**चर्चेसाठी येणारे महत्त्वाचे प्रश्न**

मुंबई प्रांतिक को. कौन्सिलची पहिली बैठक मुंबई येथें शनिवार, ता. १५ रोजीं भरणार आहे. तिचें उद्घाटन अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता हे करतील. बैठकींत खालील प्रश्नांचा विचार होणार आहे, असें समजतें:—

(१) सहकारी सोसायट्यांनीं सुरू केलेल्या कापड-धान्य वांटपासंबंधीं अंगीकारण्याचें धोरण.

(२) सहकारी सोसायट्यांचे द्वारां घरबांधणीच्या कार्यक्रमास प्रोत्साहन. हाउसिंग सोसायट्यांना सरकारमार्फत व प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेमार्फत भांडवलाचा पुरवठा.

(३) शेतकी पतीच्या पुनर्घटनेबाबत कमिटीच्या शिफारसी आणि त्यांवरील सरकारचे हुकूम.

(४) जेथें प्राथमिक लँड मॉर्गेज बँका नाहींत, अशा जिल्ह्यांत मध्यवर्ती बँकांमार्फत शेतकऱ्यांना दीर्घकालीन गरजांसाठीं भांडवल पुरवठा.

(५) वृत्तपत्रें, फलक, चित्रपट इत्यादि द्वारां जनतेंत सहकारी चळवळीचा प्रचार.


### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., (सातारा)

### पुणें शाखा

## नोटीस

सदर शाखेची, १७९ बुधवार लक्ष्मी रोड येथील चालू ऑफीसची जागा कामाला अपुरी पडत असलेनें तारीख १-२-४९ ला ३२५ बुधवार ढमढेरे बोळांत श्रीकृष्ण टॉकीज समोर भालेराव बिल्डिंगमध्यें नेण्यांत येणार आहे. बँकेचे हितचिंतकांनीं व खातेदारांनीं सदर तारखेपासून कामकाजासाठीं नवीन पत्यावर यावें अशी विनंति आहे. ३।१।४९

कामाची वेळ:
१०॥ ते ३॥
शनिवार १०॥ ते १

मॅनेजर, पुणें शाखा

# अर्थ

बुधवार, ता. १२ जानेवारी, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## युद्ध–काळानंतर मजुरांचे पगार

महायुद्धानंतरच्या काळांत दूरवर विचार करतां मजुरांची परिस्थिति सुधारली आहे किंवा नाहीं याबद्दल सद्यःस्थितीवर प्रकाश पाडणारी कांहीं माहिती 'ईस्टर्न एकॉनॉमिस्टनें' प्रसिद्ध केली आहे. त्या माहितीवरून असें निष्पन्न होतें कीं, संघटित धंद्यांतील मजूर वर्गाचें उत्पन्न वाढत आहे असें दिसलें, तरी मजुरांची नोकरी ही कांहीं कामगार वर्गाला बेकार राहावें लागून साध्य होते व मालकवर्गावर मजुरांच्या वेतनाचा बोजा दिवसेंदिवस जास्त पडत चालला आहे. म्हणजेच आजची परिस्थिति कायम राहिल्यास मालकांनाहि मजूर वर्गाचे पगार परवडणार नाहींत. हें अनुमान ज्या आकड्यांवर आधारलें आहे ते आंकडे पुढें दिले आहेतः—

| | १९३९-४० | १९४१ | १९४३ | १९४७ |
|---|---|---|---|---|
| मजुरांच्या पगाराचा आंकडा (कोटी रुपये) | ५०·४ | ५६·७ | ९६·७ | १५५·० |
| एकंदर धंद्याच्या उत्पादनांत मजुरांच्या पगाराचा शेकडा वाटा | ३१ | २९ | २० | ३८ |
| मजुरांचें माणशीं सरासरी उत्पन्न (रुपये) | २८७·५ | ३०७·७ | ४२४·८ | ६१९.४ |
| राहाणीच्या खर्चाचा आंकडा | १०० | १०५ | १४६ | २६१ |
| वास्तविक प्रत्यक्ष दर माणशीं राहाणीच्या आंकड्यांशीं तुलना करतां मिळणारें उत्पन्न (रुपयांत) | २८७·५ | २९३·० | २९१·० | २३७·३ |

येथें दिलेले आंकडे बारकाईनें अभ्यासिले असतां, युद्ध परिस्थितीच्या दडपणामुळें व उत्पादनाला चालना मिळाल्यामुळें मजूर वर्गाला सर्वांत जास्त उत्पन्न १९४१ व १९४३ ह्या दोन सालीं मिळालें. त्यावेळीं राहाणीचें मान विशेष वाढलें नव्हतें. म्हणून सुरवातीच्या १९४० च्या मजूर वर्गाच्या उत्पन्नाशीं तुलना केली असतांहि ह्या दोन वर्षांत मजूर वर्गाचें उत्पन्न निःसंशय वस्तूंच्या रूपांत वाढलें. परंतु पुढें युद्ध संपल्यानंतर पैशांच्या रूपांत उत्पन्न २८७ पासून ६१९ रुपयांपर्यंत वाढलें तरी राहाणीचें मान २६१ झाल्यामुळें वस्तूंच्या किंवा पदार्थांच्या रूपांत मजूरवर्गाचें उत्पन्न २८७·५ पासून २३७·३ पर्यंत आलें. म्हणजे तें थोडेंसें कमीच झालें. हे आकडे मजूर वर्गाची मजुरीच्या रूपानें परिस्थिति अलीकडे सुधारलेली नाहीं हें दर्शवितात व ह्याच आंकड्यांची दुसऱ्या कांहीं आंकड्यांशीं तुलना केली असतां निघणारें अनुमान फारसें आशाजनक नाहीं, तर एकंदर दुःस्थिति दर्शविणारेंच आहे. हे दुसरे आकडे म्हणजे एकंदर औद्योगिक उत्पादनांत मजूर वर्गाच्या पगाराच्या प्रमाणाचा शेंकडेवारींत आंकडा. १९४० सालीं मजुरांच्या पगाराची एकंदर औद्योगिक उत्पादनांत शेंकडेवारी ३१ होती तर १९४१ व १९४३ सालीं ती अनुक्रमें २९ व २० होती, व १९४७ सालीं तर ही शेंकडेवारी ३८ होती. ह्या आंकड्यावरून पुढील अनुमानें निघतात. प्रत्यक्ष युद्ध–काळांत ४१ व ४३ सालीं मजुरांच्या पगाराचें प्रमाण उत्पादनाच्या मानानें बरेंच कमी झालें व तें कमी होऊनहि प्रत्यक्ष वस्तूंच्या रूपांत पगार १९४० च्या मानानें तर वाढलाच व हें सर्व होत असतांना मालक वर्गाला विशेष फायदा मिळाला हें अगदीं स्पष्ट होतें. परंतु, १९४७ सालीं मात्र मजुरांच्या पगाराच्या खर्चाचें प्रमाण एकदम शेंकडा ३८ इतकें झाल्यामुळें मालकवर्गावर मजुरांच्या पगाराचा बोजा १९४० च्या मानानेंहि शेंकडा ७ प्रमाणांत वाढला आहे. तेव्हां पैशांच्या रूपांत पगार वाढला हें खरें असलें तरी प्रत्यक्ष वस्तूंच्या रूपांत तो १९४० च्या पेक्षांहि थोडा कमी झाला व इतका कमी पगार देतानाहि मालकवर्गावरील मजुरांच्या खर्चाच्या बोजाचें प्रमाण वाढलें आहे असें दिसतें. ही परिस्थिति एकंदर आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें फारशी आशाजनक नव्हे.

### उत्पादन आणि कामगारांची कार्यक्षमता

औद्योगिक कारखान्यांना लागणारें जळण हिंदुस्थानांत मुख्यत्वें करून कोळशाचें वापरतात. अर्थातच कोळशाच्या उत्पादनांत होणारी घट अगर वाढ औद्योगिक उत्पादनाच्या दृष्टीनें महत्त्वाची ठरते. १९३८ सालीं हिंदुस्थानच्या खाणींतून २,८३,५२,९०६ टन कोळसा बाहेर काढण्यांत आला. १९४७ सालीं कोळशाचें उत्पादन ३,००,७३,१४६ टन झालें. १९४८ सालांतील उत्पादन बहुधा १९४७ सालच्या उत्पादनाच्या जवळपास राहील. आतां कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या मजुरांच्या रोजच्या सरासरीकडे नजर टाकली तर त्यांतही मजुरांच्या संख्येंत वाढ झाल्याचें दिसून येतें. १९३८ सालीं ही सरासरी संख्या २,०१,०९३ इतकी होती १९४७ सालीं ती ३,२१,५३७ इतकी झाली. १९४८ सालीं सुद्धा ह्या सरासरींत फारसा फरक पडला असेल असें मानण्यास जागा नाहीं. एकूण उत्पादन आणि मजुरांची दैनंदिन सरासरी ह्या दृष्टीनें उत्पादनाची परिस्थिति सुधारल्यासारखी वाटते खरी; तथापि इतर कांहीं बाजूंनीं विचार केला तर समाधान मानण्यास तितकीशी जागा नाहीं. १९३८ सालीं प्रत्येक कामगार दरवर्षी सरासरी १४१ टन कोळसा काढीत असे. १९४७ सालीं कामगारांच्या उत्पादनाची वार्षिक सरासरी ९३·७ टनापर्यंत खालीं घसरलेली आहे. झारिआ आणि राणीगंज येथील उत्पादनाचे आंकड्यावरून असें दिसतें कीं, दरडोई उत्पादन १९४७ सालाच्याही खालीं आतां जात आहे. ह्यावरून असें दिसतें कीं १९३८ ते १९४८ ह्या दहा वर्षांत कोळशाच्या कामगारांचे दरडोई उत्पादन घटत गेलें आहे. उत्पादनांत झालेली ही घट ३५ टक्क्यांच्या आसपास असावी; तथापि ह्याच काळांत कामगारांचें वेतन मात्र वाढविण्यांत आलें आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. उत्पादन-वाढ दिसली तरी ती आर्थिक दृष्ट्या कशी आतबट्ट्याची होऊं शकते, ह्याचें हें उदाहरण आहे. कामगारांस वेतनवाढ देऊन त्यांचा राहणीचा दर्जा सुधारावा व त्यांनीं ज्यास्त उत्पादन करावें, ही अपेक्षा फलद्रूप कशी होईल, ह्याची काळजी विचारवंतांना लागली असल्यास नवल नाहीं.

—

# स्फुट विचार

## दुर्मीळ डालर्सची उधळपट्टी ?

हैदराबाद येथें अखिल भारतीय आर्थिक परिषद् नुकतीच भरली होती. ह्या परिषदेंत हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं अनेक तज्ज्ञ अर्थशास्त्रज्ञांनीं आपआपल्यापरीनें उद्बोधक भाषणें केलीं. तथापि प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. राव ह्यांनीं आपल्या भाषणांत डॉलर्सच्या खर्चाबद्दल दिलेला इशारा सद्यः परिस्थितींत फार महत्त्वाचा असल्यानें त्या इशाऱ्याचा विचार करणें योग्य ठरेल. परदेशीय हुंडणावळ, विशेषतः डॉलर्स, मिळविण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें निर्यातीवरील निर्बंध ढिले करण्याचें धोरण स्वीकारलें आहे. ह्या डॉलर्सचा मोबदला देऊन हिंदुस्थानाला डॉलर्सच्या कक्षेंतील देशाकडून भांडवली स्वरूपाचा माल आणि अन्नधान्यासारखीं चरितार्थाचीं साधनें, अशी दोन्ही प्रकारची आयात करावयाची आहे. निर्यातीवरील निर्बंध सैल करून ही निर्यात वाढावी तशी वाढत नाहीं. ताग, गळिताचीं धान्यें, कच्चीं कातडीं, ह्यांची निर्यात अधिक प्रमाणांत झाल्याशिवाय आपणास हवे असलेले डॉलर्स मिळणार नाहींत, असें दिसतें. निर्यात वाढवून डॉलर्स मिळविण्याची ही योजना मान्य केली, तरीसुद्धा मिळालेल्या डॉलर्सचा उपयोग कसा केला जातो हीहि बाब अत्यंत महत्त्वाची आहे. श्री. राव ह्यांनीं आपल्या भाषणांत असा मुद्दा मांडला आहे कीं, मोटारीसारख्या चैनीच्या वस्तूवर दुर्मिळ असे बरेच डॉलर्स खर्च होत आहेत. १९४७-४८ सालीं हिंदुस्थानांत किती मोटारी आयात झाल्या त्यांची संख्या सरकारनें जाहीर करावी, अशी सूचना त्यांनीं केली आहे. प्रत्येक संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति सुरू झाल्याबरोबर मंत्र्यांना 'ब्यूक'सारख्या मोटारगाड्या तात्काळ जरूरीच्या होऊन बसतात, असा आरोप त्यांनीं केला आहे; इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानांत आयात झालेल्या मोटारींची संख्या व त्यांचे मालक ह्यासंबंधीं चौकशी करण्याचाहि आपला मानस त्यांनीं व्यक्त केला आहे ! श्री. राव ह्यांनीं डॉलर्सची जी उधळपट्टी सूचित केली आहे, ती खरोखरीच झाली असेल तर आयात-निर्यातीबद्दलचें हिंद सरकारचें धोरण एकांगी, अपूर्ण आणि देशाच्या आर्थिक सुस्थितीच्या दृष्टीनें दोषार्ह आहे असें म्हणणें भाग पडेल.

---

## कातडीं कमावण्याचा धंदा

कमावलेलीं कातडीं व चामडें यांचा पक्का माल बनविण्याचा धंदा हिंदमध्यें जवळ जवळ प्राथमिक अवस्थेंत आहे. कारण, कच्च्या कातड्यापासून पक्कें चामडें बनविण्याची कला अद्याप आपल्याकडे पूर्णावस्थेस पोंचलेली नाहीं. वास्तविक कातडें कमावणें हा आधुनिक काळांतील एक महत्त्वाचा धंदा आहे. हिंदमधून दरवर्षी १७ कोटी रुपये किंमतीचीं कच्चीं व अर्धवट कमावलेलीं कातडीं निर्यात होतात. कमावलेलीं कातडीं तयार करण्याच्या कारखान्यांची संख्या १९१३ सालीं २२ असून, १९४१ सालीं ५६ व १९४५ सालीं २३४ होती. त्या प्रत्येक वर्षी कारखान्यांतील मजुरांची संख्या अनुक्रमें २४१२, ९०२० व १५८५० इतकी होती. ह्या अगदीं अलिकडच्या आंकड्यावरूनच कातडीं कमावण्याचा धंदा किती प्राथमिक अवस्थेंत अजूनहि आहे याची कल्पना करतां येते. कातडीं कमावण्याचे बहुतेक कारखाने आधुनिक यंत्रसाहित्य असलेले नाहींत. यामुळें कातडीं कमावण्याची पद्धति इंग्लंड, अमेरिका, झेकोस्लोव्हाकिया इ. देशांप्रमाणें उर्जितावस्थेस पोंचलेली नाहीं. ह्याचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे भांडवलदार वर्गाचें ह्या धंद्यांत भांडवल गुंतविण्याकडे इतर मोठ्या धंद्यांप्रमाणें लक्ष विशेषसें गेलेलें नाहीं. हा धंदा परंपरेनें अगदी हलक्या प्रतीचा समजण्यांत आल्यामुळेंहि अद्यापपर्यंत त्याकडे बुद्धिमान व सुशिक्षित लोकांनीं दुर्लक्ष केलें आहे. कातडीं कमाविण्याची विद्या ही रसायनशास्त्राच्या दृष्टीनें सुशिक्षितांनीं हस्तगत केली पाहिजे. गेल्या वर्षी सरकारनें मद्रास येथें चामड्याचें संशोधन करण्यासाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापन केली आहे. ह्या संस्थेंत कातडीं कमाविण्याचें शिक्षण देणें किंवा संशोधन करणें हळूहळू शक्य होईल, व त्यामुळें थोड्या प्रमाणांत ह्या धंद्याकडे जनतेचें लक्ष वळूं शकेल.

---

## सुधारणा कशी होईल ?

परंतु एवढ्या किरकोळ सुधारणेनें कातडीं कमावण्याचा धंदा उर्जितावस्थेस येणें शक्य नाहीं. त्यासाठी कारखानदार व रसायनशास्त्रज्ञ ह्यांनींच नेटानें प्रयत्न करणें जरूर आहे. कारण, अतिशय उपेक्षिलेल्या धंद्यांपैकीं हा एक धंदा असल्यामुळें ह्या धंद्याची सुधारणा करण्याकडे कोणाचेंच लक्ष गेलेलें नाहीं. ह्या धंद्यांतील लोकांची व कारखानदारांची संघटना नाहीं. हिंदच्या औद्योगिक जीवनांत कातडीं कमावण्याच्या धंद्याचें नांव विशेषसें एकूं येत नाहीं. निरनिराळ्या धंद्यांना, टॅरिफ बोर्डाकडून चवकशी करण्यांत येऊन औद्योगिक संरक्षण दिलें जातें. असें औद्योगिक संरक्षण अद्याप ह्या धंद्याला देण्यांत आलेलें नाहीं. परंतु केवळ संरक्षणानें हा धंदा उर्जितावस्थेस येणें शक्य नाहीं. कापड, साखर, पोलाद, इ. धंदे संरक्षक जकातींमुळें सुधारूं शकले व मजबूत पायावर स्थापन झाले; याचें मुख्य कारण भांडवलदार व सुशिक्षित लोकांचें लक्ष प्रथमपासूनच ह्या धंद्याकडे गेलें. कच्च्या किंवा अर्धवट कमावलेल्या कातड्याची निर्यात कायद्यानें थांबवूनहि, कातडीं कमावण्याच्या धंद्याची सुधारणा होणें केव्हांहि शक्य होणार नाहीं अशी सध्याची परिस्थिति आहे. औद्योगिक व रासायनिक शिक्षणक्रमामध्यें कातडीं कमावण्याच्या कलेला स्थान मिळालें पाहिजे. मुंबई, मद्रास, पश्चिम बंगाल व पूर्व पंजाब ह्या प्रांतांत गुरें जास्त असल्यामुळें त्या प्रांतिक सरकारांनीं आपल्या औद्योगिक पुनर्घटनेच्या योजनांत कातडीं कमावण्याच्या धंद्याला विशेष स्थान दिलें पाहिजे व कारखानदार आणि सुशिक्षित तरुण ह्यांचें लक्ष ह्या धंद्याकडे वळवलें पाहिजे. परदेशांत शिक्षण मिळविण्यासाठींहि तरुणांना पाठविलें पाहिजे.

---

## कंपन्यांच्या वार्षिक सभा : वर्षअखेर गांठण्याची प्रवृत्ति

वर्षाच्या अगदी अखेरपर्यंत आपल्या वार्षिक सभा ढकलण्याच्या डायरेक्टरांच्या व मॅ. एजंटांच्या प्रवृत्तीविरुद्ध भागीदारांत जागृति होऊं लागली आहे, असें दिसतें. गुरुवार, ता. ३० डिसेंबर च्या 'दि टाइम्स ऑफ इंडिया'च्या स्थानिक कार्यक्रमाच्या सदरांत १३ कंपन्यांच्या वार्षिक सभा जाहीर केलेल्या होत्या आणि त्या सर्व सुमारें तीन तासांचे अवधींतच भरणार होत्या. म्हणजे, जे अनेक कंपन्यांचे भागीदार आहेत त्यांना त्यांच्या वार्षिक सभेस उपस्थित रहाणेंहि कठीण व्हावयाचें. कांहीं कंपन्यांचा ताळेबंद कित्येक महिन्यांपूर्वीच्या तारखेचा असला तरी त्यांची वार्षिक सभा मात्र इंग्रजी वर्षाची अखेर गांठते. ह्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी कांहींतरी उपाययोजना करण्यांत यावी, असें सुचविण्यांत येत आहे. कंपनी कायद्यांत दुरुस्ती करून, रजिस्ट्रारला त्याबाबत कांहीं अधिकार देण्यांत यावे, अशी एक सूचना आहे.

# मेमोरँडम व आर्टिकल्स मधील करारांचे उल्लेख

## करार बंधनकारक कोणचे व केव्हां ठरतात ?

### कंपनी कायद्याखालील विवेचन.

( श्री. स. वा. दातार. )

आर्ट कॅलेन्डर लिमिटेड ह्या कंपनीसंबंधीं एक दावा नुकताच पुणें सिव्हिल जज्ज कोर्टांत लढविला गेला. त्या दाव्यांत कायद्याचा असा एक मुद्दा उपस्थित झाला होता कीं, कंपनीच्या मेमोरॅण्डम्मध्यें व आर्टिकल्समध्यें ज्या करारांचा उल्लेख असेल अथवा जे करार नमूद असतील ते करार केवळ त्या उल्लेखांवरूनच कंपनीवर बंधनकारक ठरतील काय ?

सदर कंपनीच्या आर्टिकल्समधील एका कलमामध्यें मेसर्स पी. एस्. काणे ॲन्ड को. ह्या पेढीस कंपनीचे मॅनेजिंग एजंट नेमलें आहे व डायरेक्टरांना तत्संबंधींचे करारपत्र करून यावयास अधिकार देण्यांत आला आहे, अशा आशयाचा मजकूर होता. परंतु मॅनेजिंग एजन्सीच्या करारपत्राचा मसुदा पसंत करून त्याप्रमाणें स्टॅम्पावर करारपत्र लिहून त्यावर सह्या होऊन व ते नोंदवून पक्के करण्याचें काम डायरेक्टरांकडून कधींच झालेलें नव्हतें. अशा स्थितींत कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीबाबत वाद उत्पन्न होऊन प्रकरण कोर्टांत गेलें. तेव्हां आर्टिकल्समधील मजकुरावरूनच वरील पेढीस मॅनेजिंग एजन्सीचे अधिकार प्राप्त होतील काय ? असा एक प्रश्न उपस्थित झाला.

ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मेमोरॅण्डम् व आर्टिकल्स ह्यांचेमध्यें नमूद असलेल्या करारांचे पुढीलप्रमाणें दोन वर्ग पाडावे लागतील: ( १ ) कंपनी व कंपनीचे भागदार ह्यांचे मधील केवळ सभासदत्वाबाबतचे करार आणि ( २ ) कंपनी व तिचे सभासद वा तिऱ्हाईत व्यक्ति ह्यांचेमधील सभासदत्त्वाव्यतिरिक्त अन्य संबंधांचे करार. मेमोरॅण्डम् व आर्टिकल्समधील ह्या वर्गाच्या करारांच्या उल्लेखांना अथवा तपशिलाला प्रचलित कंपनी कायद्यानुसार फार वेगवेगळ्या प्रमाणांत व फार वेगवेगळ्या प्रकारची बंधनकारकता प्राप्त होते.

#### सभासदत्वाचे करार

मेमोरॅण्डम् व आर्टिकल्समध्यें सभासदांच्या सभासदत्वाबाबतचे जे करारमदार नमूद असतात त्या सर्वांना अप्रतिबंध बंधनकारकता असते. उदाहरणार्थ, 'ब्रॅडफर्ड बॅंकिंग कंपनी विरुद्ध ब्रिग्स' ह्या दाव्यांतील कंपनीच्या आर्टिकल्समध्यें कंपनीच्या येण्याबाबत सभासदांच्या भागांवर कंपनीचा बोजा (लीएन्) राहील अशी एक शर्त होती. एका भागदारानें आपले भाग एका बॅंकेकडे तारण ठेवून कर्ज काढलें. तेव्हां कोर्टानें निर्णय दिला कीं, आर्टिकल्समधील शर्ती भागदारावर बंधनकारक आहेत. त्याच्या भागांवरील कंपनीचा बोजाचा हक्क प्रथमचा राहील व नंतरचा बॅंकेचा राहील. त्याचप्रमाणें 'बोर्लंड विरुद्ध सील ब्रदर्स' ह्या दाव्यांतील कंपनीच्या आर्टिकल्समध्यें असा करार होता कीं, कोणा सभासदाचें दिवाळें निघाल्यास त्याचे भाग कंपनी सांगेल त्या माणसाला विकावे लागतील. दुर्दैवानें एका सभासदाचें दिवाळें निघून त्याची मिळकत कोर्टानें पंचांच्या ताब्यांत दिली. पंच म्हणूं लागले, 'आर्टिकल्समधील भागविक्रीचें कलम आमचेवर बंधनकारक नाहीं. आम्ही कोणालाहि भाग विकूं !' परंतु कोर्टानें हें त्यांचें म्हणणें ग्राह्य धरलें नाहीं. सारांश, सभासदत्वाबाबतचे जे जे करार मेमो व आर्टिकल्समध्यें नमूद असतील ते सर्व केवळ तसे नमूद आहेत, म्हणूनच उभयतां कंपनी व तिचे सभासद ह्या दोघांवरही पूर्णपणें बंधनकारक असतात.

#### सभासदत्वाव्यतिरिक्त अन्य करार

कंपनीच्या मेमोरॅण्डम् व आर्टिकल्समध्यें भागदारांच्या सभासदत्त्वाव्यतिरिक्त इतर अन्य संबंधाबाबतच्या करारांचे जे उल्लेख वा तपशील असतात त्यांना स्वयंसिद्ध असें बंधनकारिकत्त्व अजिबात नसतें. मग ते करार सभासदांपैकीच कोणा एकाशीं असोत वा अन्य तिऱ्हाईत माणसाशी असोत. केवळ मेमो वा आर्टिकल्समधील उल्लेखांमुळें त्यांना कायदेशीरपणा कधींच येत नाहीं. उदाहरणार्थ, मॅनेजिंग एजन्सीचा करार. हा करार सभासदत्त्वाव्यतिरिक्त अन्य गोष्टींचा करार असल्याकारणानें स्वतंत्र करारपत्र झाल्याशिवाय केवळ मेमो वा आर्टिकल्समधील उल्लेखांमुळें ह्या करारास कोणत्याहि प्रकारचा कायदेशीरपणा अजिबात येत नाहीं. ह्याबाबतचा मुंबई हायकोर्टाचा एक अधिकृत निवाडा म्हणजे ३६ बॉम्बे लॉ रिपोर्टर ९०७ हा होय. त्यांत न्यायमूर्ती रांगणेकर यांनीं असा स्पष्ट निर्णय दिला आहे कीं मेमो अथवा आर्टिकल्समधील मॅनेजिंग एजन्सीच्या कराराचे उल्लेख हे केवळ उद्दिष्टसूचक व अनुज्ञावजा असून प्रत्यक्ष करारपत्र झाल्याशिवाय त्यांना कायदेशीर बंधक स्वरूप येत नाहीं.

सिव्हिल जज्जांचे निकाल तत्सम कोर्टांवर बंधनकारक नसतात व त्यांवर हायकोर्टापर्यंत अपिलें होऊं शकतात म्हणून हायकोर्ट वा त्यावरील कोर्टांचेच निर्णय अधिकारयुक्त समजले जातात व ते प्रसिद्ध करणें युक्त ठरतें. ह्यासाठी सदरील दाव्यांतील कायद्याच्या प्रश्नाचें तेवढें विवेचन येथें स्वतंत्रपणें दिलें आहे.

( वकील:—मॅनेजिंग एजंट्सतर्फे श्री. वाघोलीकर; विरुद्ध बाजूतर्फे श्री. भोंडे, श्री. वा. रा. होनप व श्री. वेंद्रे. )

---

**टेलिफोनची नोंद करणारा यांत्रिक मेंदू**—बेल टेलिफोन लॅबोरेटरीजतर्फे न्यूयार्कमध्यें एका टेलिफोनविषयक नवीन यंत्राचें प्रात्यक्षिक करून दाखविण्यांत आलें. हें यंत्र विजेच्या साह्यानें चालतें. डायल फिरवून आलेल्या कॉल्सची नोंद करणें, त्यांचें वर्गीकरण करणें आणि प्रत्येक टेलिफोनचें बिल तयार करणें हीं कामें हें यंत्र करून दाखवितें.

**गांधी-फंडाला कामगारांची देणगी**—सोलापूरच्या कामगारांनीं गांधी-स्मृतिफंडाला ५ लाख रुपये देणगीदाखल द्यावे असा निर्णय राष्ट्रीय गिरणी कामगार संघाच्या कार्यकारी समितीनें घेतला आहे. सोलापुरांत सुमारें ३५,००० कापड गिरणी कामगार आहेत. प्रत्येक कामगारानें आपलें पांच दिवसांचें वेतन फंडाला द्यावें अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

**बोलपटांच्या लांबीवर मर्यादा**—मद्रास सरकारनें बोलपटांची लांबी १५ हजार फुटांवर असतां कामा नये असा हुकूम काढला आहे. सिनेमा-गृहांतून सक्तीनें दाखविल्या जाणाऱ्या शिक्षणविषयक चित्रपटांच्या लांबीचाही समावेश त्यांतच करण्यांत आला आहे. ज्या चित्रपटांची लांबी १५ हजार फुटांपेक्षा अधिक आधींच ठरविण्यांत आली असेल ते ३१ मार्च, १९४९ पूर्वी पुरे करण्यांत आले पाहिजेत असें बंधन घालण्यांत आलें आहे. मद्रास सरकारचे हे हुकूम १ जानेवारी, १९४९ पासून अंमलांत आले आहेत.

**अमृतसर-श्रीनगर मोटार सर्व्हिस**—अमृतसर ते श्रीनगर रस्त्यावर वहातूक करणारी सरकारी मालकीची सर्व्हिस पूर्व पंजाब सरकार चालू करणार आहे, असें समजतें.

जयपूर कॉंग्रेस

## कॉंग्रेस आणि अर्थकारण

( मागील अंकावरून समाप्त )

निवडणुकीच्या जाहीरनाम्यांतील कार्यक्रम पार पाडावयाचा, तर मध्यंतरी दोन वर्षांचा काळ लोटला असून आजची परिस्थिति अनुकूल नाहीं, असें सांगून डॉ. पट्टाभि सीतारामय्या आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणतात, "महत्त्वाच्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण हा कॉंग्रेसचा एक कार्यक्रम आहे. तथापि जुने कारखाने घेणें किंवा नवीन कारखाने काढणें याला पैसा लागतो, तज्ज्ञ माणसें लागतात. चालू कारखाने सरकारच्या ताब्यांत घेणें ही कांहीं एकदम करतां येण्यासारखी गोष्ट नाहीं.

### परस्पर विरोधी गोष्टींचा समन्वय

आम्ही जमीनदारी नष्ट करण्याचें ठरविलें. जमीनदारांना ३०० कोट रुपये द्यावे लागतील.

आम्ही दारुबंदी केली. प्रांतिक सरकारचें एक महत्त्वाचें उत्पन्न बुडालें. तुटीचीं अंदाजपत्रकें तयार झालीं.

प्रचंड धरणांच्या योजना आंखल्या. काम पुरें होण्यास वेळ लागेल. यंत्रसामग्री मिळत नाहीं. औद्योगीकरण हा अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न आहे.

देशी धंद्यांना उत्तेजन द्यावयाचें तर परदेशी आयात कमी होते. हे सारेच कार्यक्रम चलनवाढीला—महागाईला पोषक आहेत!

पुंजीपती भांडवल रोखून धरत आहेत; कामगार—किसान हात आखडत आहेत; सरकार क्रांतिकारक कार्यक्रम मांडीत आहे.

आयुष्य हें परस्परविरोधी गोष्टींचें कडबोळें आहे—आणि म्हणूनच समन्वयाच्या भोंवतीं घोटाळत असतें.

राष्ट्रीयीकरणादि महत्त्वाच्या व अवघड गोष्टींचा विचार सरकारी अनुभवी तज्ज्ञ मंडळीकडे सोंपविलेला बरा."

हिंदुस्थान मजूर सेवक संघाच्या बैठकींत बोलतांना सरदार पटेल म्हणाले, "इंग्लंड—अमेरिकेप्रमाणें आपल्या देशांत उद्योगधंद्यांची वाढ झालेली नाहीं. नवीन कारखाने—उद्योग आपल्याला अद्याप सुरू करावयाचे आहेत. अशा महत्त्वाचे वेळीं सुरवातीसच संप आणि वर्गकलह यांत गुरफटलों तर आपल्या राष्ट्राची प्रगतीच खुंटेल. औद्योगीकरणानंतरच राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न. चालू काळांत नवीन धंदे सुरू करून, कारखाने काढून, आपल्यांतील दारिद्र्याची हकालपट्टी करूं या."

ह्याच विचाराचे उद्गार पंडीत नेहरूंनीं किसानांना उद्देशून काढले. "लवकरच जमीनदारी नाहींशी होईल. तथापि तेवढे केल्यानें शेतकऱ्यांना काय मिळेल! प्रगतीचा मार्ग खुला होईल इतकेंच. कष्ट करून उत्पादन वाढविल्यानेंच समृद्धि येईल. प्रचंड उत्पादन करीत असल्याकारणानें अमेरिकेची आजची श्रीमंती आहे. राष्ट्राच्या संपत्तीचें मापन सोन्याचांदीनें करावयाचें नसून देशांत नित्योपयोगी वस्तूंचें उत्पादन किती आहे यावरून करावयाचें असतें. अशा स्थितींत संपावर न जातां आपली गाऱ्हाणीं सरकारनें नेमलेल्या लवादामार्फत सोडवून घेणें हें देशाच्या व किसानांच्या दृष्टीनें श्रेयस्कर आहे."

याच सभेंत श्री रंगा यांनीं सुचविलें कीं शहरी मंडळींपेक्षां खेडेगांवांतील जनता व शेतकरी यांचेकडे सरकारनें अधिक लक्ष द्यावें. शेतांत काम करणाऱ्यांना योग्य वेतन देतां येईल, शेतकऱ्याला सुखासमाधानें राहतां येईल अशा बेतानें त्यांनीं तयार केलेल्या पिकांच्या किंमती सरकारनें ठरवाव्यात.

शेतकी-कामगारांचा प्रश्न अवघड आहे हें मान्य करून डॉ. पटाभि सितारामय्या म्हणतात कीं या अति-दलित कामगाराला त्याचे न्याय्य हक्क मिळालेच पाहिजेत. त्यांची रहाणी सुधारणें हा निकडीचा प्रश्न आहे. प्रश्नाचा अवघडपणा आणि उपाय योजनेतील अडचणी या कारणांनीं आपले प्रयत्नांची गती मंद होतां उपयोगी नाहीं. प्रश्न जिव्हाळ्याचा आणि तातडीचा आहे.

### ग्रामीण जीवन व ग्रामोद्योग

आपल्या राष्ट्राचा आत्मा इतस्ततः विखुरलेल्या सात लक्ष खेड्यांत आहे. शहरांतून औद्योगीकरण झालें असेल; तथापि त्यांना लागणारें अन्न-पाणी आणि कच्चा माल यांचा पुरवठा, सदैव खेड्यांतूनच होतो. खेडुतांची कर्जबाजारी नाहींशी करण्याचें कार्य प्रत्यक्ष खेड्यांतच सुधारणा-केंद्रें स्थापून केलें पाहिजे. मध्यवर्ति सरकारच्या 'अधिक धान्य पिकवा' इत्यादि योजना खेड्यांत पोंचविण्याचें अवघड पण आवश्यक काम हींच केंद्रें कालान्तरानें करूं लागतील. ग्रामपंचायतींकडेही लक्ष दिलें पाहिजे. शेतीविषयक बाबतींत संशोधन, सल्ला व कृति यांची आवश्यकता आहे.

खेडेगांवीं व्यवसायांचें पुनर्जीवन केलें पाहिजे. वीज पाहिजे. प्रयोगशाळा व प्रात्यक्षिकें खेडेगांवांत पोंचलीं पाहिजे. स्थानिक भाषेंत लिहिण्या-वाचण्याचें तसेंच धंदे शिक्षण देणाऱ्या संस्था खेड्यांतून स्थापन झाल्या पाहिजेत. खेडेगांवांतून देशाला लागणारा केवळ मालच नव्हे तर कारखानदारही निर्माण होतील अशा पद्धतीनें ग्रामीण जीवनाची पुनर्घटना होणें आवश्यक आहे.

खेडेगांवीं धंदे कां हवेत?

थोडी जमीन नि पुष्कळ माणसें अशी स्थिति आहे म्हणून. शेतीवर अवलंबून असणाऱ्या मंडळींची संख्या कमी व्हावी म्हणून. रिकाम्या वेळांत व्यवसाय हवा म्हणून.

जपानमध्यें प्रत्येक घर हा एक छोटेखानी कारखाना आहे. खुद्द टोकिओंत एक किंवा दोन खोल्यांत सामावणारे पन्नास हजार कारखाने आहेत! केवळ बांबूपासून १२० वर निरनिराळ्या कलाकृति उपयुक्त वस्तु बनवितात. शेतकी व्यवसायांतील कामगार फुरसतीचे वेळीं कारखान्यांत काम करतात. ६८ सरकारी नमुनेदार कारखान्यांतून हे खेडेगांवीं व्यवसायांतील तज्ज्ञ तयार होत आहेत. शेतकी धंद्याबाबत शेतकऱ्यांना मोफत शिक्षण दिलें जातें तर सात वर्षांचें प्राथमिक शिक्षण घेतलेल्या तरुण-तरुणींना औद्योगिक शिक्षण देण्यांत येऊन शेतीवर अनाआवश्यक भार न पडण्याची, तसेंच खेडेगांवांत करतां येण्यासारखा धंद्यांची शहरांत गर्दी न होऊं देण्याची व्यवस्था होते.

खेडेगांवें उठून जाऊन मोडकळीस येऊं नयेत म्हणून शेतकऱ्यांनीं फावल्या वेळांत ग्राम-उद्योग करावेत अशी जपानी सरकारची खटपट असते.

जपानचा पराभव झाला. मोठे कारखाने सुरू होऊन युद्धापूर्वीची भरभराट यावयास अजून अवकाश आहे. तरीही कामांत, व्यवसायांत दंग आहे, प्रगति-पथावर आहे. आपल्याला जपानपासून शिकण्यासारखें पुष्कळच आहे.

तथापि चरखा, खादी, ग्रामीण धंदे हे कांहीं एकट्या-दुकट्यानें सोडवावयाचे प्रश्न नव्हत. खरेदी व विक्रीची व्यवस्था, निरनिराळ्या प्रांतांचीं वैशिष्ट्यें, तज्ज्ञ, शिक्षण, प्रगति इत्यादि गोष्टींचा विचार योजना, संगता, सरकारनें करावयाची आहे.

ग्रामीण जीवन व ग्रामोद्योग बाबतचे वरील विचार अध्यक्षीय भाषणांत व्यक्त केलेले आहेत.

### कामगार

औद्योगिक तसेंच शेतकी जीवनाला वळण लावणारे, जगविणारे कामगार हेंच शाश्वत भांडवल आहे. आर्थिक व्यवस्थेवर आधारलेल्या आपल्या समाजजीवनांत श्रमिकांचें स्थान केवळ महत्त्वाचेंच नव्हे तर अत्युच्चहि आहे.

" श्रमिकांच्या हक्कासाठीं व त्यांची पिळवणूक थांबविण्यासाठीं कॉंग्रेस झटलेली आहे. कॉंग्रेसची सहानुभूति, पाठिंबा व मार्गदर्शन या खतपाण्यावरच देशांतील ट्रेड युनिअन चळवळ रुजली, वाढली आहे.

राजकीय स्वातंत्र्याच्या पोटांत सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य सामावलेलें असतें हें जाणून कॉंग्रेसनें प्रथम साम्राज्यशाहीविरुद्ध लढा लढविला. आतां स्वराज मिळालें असल्यानें प्रत्येक कॉंग्रेस कार्यकर्त्यानें कामगार क्षेत्रांत अधिक भाग घेऊन कामगार व मालक मंडळी यांचे न्याय्य संबंध वाढवावे.

सरकारनें कामगारविषयक केलेले कायदे कॉंग्रेसला पसंत असून प्रांतिक सरकारांनीं किमान वेतन कायद्यानुसार किसानांची स्थिति सुधारण्याची ताबडतोब व्यवस्था हातीं घ्यावी.

कामगारांच्या अडचणींची व त्रासांची जाणीव कॉंग्रेसला आहे. तथापि सध्यांची बिकट परिस्थिति लक्षांत घेऊन कामगारांनीं त्या जाणीवेनें व जबाबदारीनें वागावें. संपाला बळी पडून उत्पादनांत अडथळे आणूं नयेत.

सरकारनें औद्योगिक तहनामा अगदीं वेळेवर जाहीर केला असून औद्योगिक क्षेत्रांत कामगार व मालक यांनीं शांतता व सलोख्याचे संबंध ठेवावेत व उत्पादनांत वाढ करावी. तसें केलें तरच आजची दुःसह स्थिति सुधारेल.

कामगारांना योग्य पगार व नफ्यांत वाटा देणें जरूर आहे. सरकारांनीं ह्याबाबत लवकरच व्यवस्था करावी. "

—' कामगारांना आश्वासन ' प्रस्ताव.

व्यक्तीच्या सर्वांगीण उन्नतीच्या आड कोणतीही अडचण येऊं न देणारी, व्यक्तिमत्वाच्या वाढीला उत्तेजन देणारी, क्रमशः सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक पिळवणूक व विषमता, तसेंच समाजांतील व आर्थिक व्यवहारांतील नफेबाजी आणि समाजविरोधकांच्या हातांतील केंद्रीभूत सत्ता काढून घेणारी–नाहींशी करणारी समाजव्यवस्था करण्याच्या उद्देशानें मे १९४७ मध्यें कॉंग्रेसप्रणीत इंडिअन नॅशनल ट्रेड युनिअन कॉंग्रेस स्थापन झाली. कामगारांबाबतचें कार्य कॉंग्रेस या युनिअनमार्फत करणार आहे. ह्या युनिअनला अजून बरेंच कार्य करावयाचें आहे याची जाणीव कॉंग्रेस कार्यकर्त्यांना आहे.

× × ×

कॉंग्रेस अधिवेशनाचा मेळावा जयपूरजवळ तीन मैलांवर वसविलेल्या गांधीनगरांत भरला होता. पाणी–वीज खेळविलेल्या नगरींत साठ हजार मंडळींची राहण्याची सोय करण्यांत आली होती. पन्नास लक्ष रुपयांवर खर्च झाला. अधिवेशनास दोन लाखांवर समाज जमा झाला होता. अधिवेशनांना आलेले सध्यांचे मेळ्याचें स्वरूप बदलून, गंभीर प्रश्नांची समस्या सोडविण्यास पोषक अशा वातावरणांत यापुढील अधिवेशनें भरविलीं जावीत, अशी इच्छा समारोपादाखल केलेल्या भाषणांत पंडीत नेहरूंनीं व्यक्त केली.

—संजय

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.









## बँकांसाठी नियमावली

### मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेल्या स्टँडिंग ऑर्डर्स

बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन्स ॲक्ट १९४६ खालीं प्रांतांतील बँकांसाठी स्थायी नियमावली ( मॉडेल स्टँण्डिंग ऑर्डर्स ) मुंबई सरकारनें गॅझिटांत प्रसिद्ध केली आहे. तिच्या सारभागाचा पहिला हप्ता पुढें दिला आहे.

**नोकरांच्या नेमणुका व वर्ग**

या नियमावलीनुसार बँक–नोकरांचे चार वर्ग पाडले असून त्यांजवर मॅनेजर यांची हुकुमत चालणार आहे. मॅनेजर या संज्ञेत [illegible] यांचाहि अंतर्भाव होतो. ( १ ) पहिला वर्ग कायम नोकरांचा. [illegible] लेखी नेमणूक–पत्र देऊन ज्यांना कायम नोकरी दिलेली असेल [illegible] समावेश होईल. ( २ ) दुसरा वर्ग प्रतीक्षा-कालीन ( प्रोबेशनर ) नोकरांचा. कायम नोकरांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर ज्यांची नेमणूक झाली आहे, परंतु ज्यांना कायम केल्याचा हुकूम अजून झालेला नाहीं, अशा नोकरांचा या वर्गात समावेश होईल ( ३ ) तिसरे तात्पुरते नोकर व ( ४ ) चवथे उमेदवार ( ॲप्रेन्टिसेस ) · मात्र ज्यांची एकूण उमेदवारी एक वर्ष झालेली असेल त्याना उमेदवारांच्याच वर्गात डांबून ठेवता येणार नाहीं. नेमणूक करतांना, नोकरी कायम करतांना, बढती देतांना अथवा एका वर्गातून दुसऱ्या वर्गांत घालतांना तत्संबंधी लेखी हुकूम बँकेनें प्रत्येक नोकरास द्यावयाचा आहे.

**कामाच्या वेळा**

नोकरांच्या कामाच्या वेळा नेमणूक-पत्रांत नमूद नसल्या तर त्या वेळोवेळीं त्यांना लेखी अथवा तोंडी सूचना देऊन ठरवून द्याव्या लागतील. कामाच्या वेळा जाहीर फलकांवरहि नमूद करता येतील. एखाद्या नोकराची कामाची वेळ बदलण्यांत आली असल्यास त्यास तत्संबंधी आगाऊ लेखी अथवा तोंडी सूचना द्यावी लागेल. साप्ताहिक सुट्यांव्यतिरिक्त ज्या सुट्या द्यावयाच्या असतील त्यांच्या तारखा, भरपाईच्या (कॉम्पेन्सेटरी) सुट्यांच्या तारखा आणि पगाराचे दिवस यांची माहिती जाहीरपत्रकें लावून द्यावी लागेल. सुट्यांच्या दिवशीं इष्ट त्या कोणाहि नोकरास कामावर बोलावितां येईल. मात्र त्या नोकरास तशी आगाऊ लेखी वा तोंडी सूचना द्यावी लागेल; आणि त्याची जी सुटी बुडाली असेल तिजबद्दल त्यांची इच्छा असल्यास त्याला भरपाईदाखल अन्य दिवशीं सुट्टी शक्य त्या त्वरेनें द्यावी लागेल. साप्ताहिक आणि भरपाईच्या सुट्या भरपगारी असतील. बँकेचे हिशेब पुरे करण्यासाठीं सरकारनें जाहीर केलेले सुट्टीचे दिवस गिऱ्हाइकांना सुट्टीचे असतील परंतु नोकरांना असणार नाहींत. नोकरांचे पगार, वर्ग वगैरे गोष्टी खास नोंदवह्यांत नमूद केलेल्या असतील व त्या वह्या कोणाहि नोकरास पाहता याव्यात म्हणून महिन्यांतून निदान दोन–तरी दिवस खुल्या ठेवल्या जातील. बँकेतील कामाच्या एकापेक्षां अधिक पाळ्या करता येतील व कोणाहि नोकरास एका पाळींतून दुसऱ्या पाळींत घालता येईल. परंतु शक्यतोंवर पाळ्या आळीपाळीनें केल्या जाव्यात अशी अपेक्षा राहील. पाळ्या सुरू करतांना, बदलतांना अथवा बंद करतांना नोकरांना पत्रकाचे द्वारा अथवा तोंडी आगाऊ सूचना देण्यांत येतील.

**हजेरी व रजा**

नोकरांनीं नेमल्यावेळीं काम करावें व जरूर तर त्यांच्या-कडून कामावर येतांना व कामावरून जातांना सह्या घेण्यांत याव्या. आजारपण आणि गर्भारपण यांचेशिवाय इतर कारणांकरितां हव्या असलेल्या रजेस मंजुरी मिळणें बँकेच्या कामाच्या सोयीवर अवलंबून राहील. हक्काची रजा कोणत्या अवधींत देता येईल त्याची माहिती, प्रत्येक नोकरास बँकेनें आगाऊ लेखी वा तोंडी द्यावी. ज्या वेळेला दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची रजा शिल्लक नसेल त्यावेळीं तसाच प्रसंग असेल तर बँकेच्या सोयी ( डिस्क्रीशन ) प्रमाणें नोकरास बिनपगारी रजा देता येईल. सर्व प्रकारच्या रजेच्या मुदतींत पडणारे नित्यनैमित्तिक सुट्टीचे दिवस हे रजेंतच अंतर्भूत धरले जातील. आजारपणासाठीं अथवा गरोदरपणासाठीं रजा मागावयाच्या अर्जासोबत डॉक्टर, वैद्य वा हकीम ह्यांचा दाखला बँकेला मागता येईल व शक्य तर बँकेनें नेमलेल्या माणसाकडून बँकेच्या खर्चानें अर्जदाराची वैद्यकीय तपासणी करता येईल. अकल्पितपणें उद्‌भवलेल्या खास प्रसंगांसाठी नोकरांना प्रासंगिक नैमित्तिक, अथवा तात्कालिक ( कॅज्युअल ) रजा मागता येईल. ह्या रजेचें स्वरूपच असें आहे कीं, तिजबद्दल आगाऊ नियम करणें शक्य नाहीं. प्रासंगिक रजा एकावेळीं तीन दिवसांपेक्षां अधिक होऊं दिली जाणार नाहीं आणि मॅनेजरांची खास आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय सुट्टीचे कोणतेहि दिवस अथवा दुसरी कोणत्याहि प्रकारची रजा ही प्रासंगिक रजेला पुढें अथवा मागें जोडून घेता येणार नाहींत. प्रासंगिक रजा ही खरोखरीच अकल्पित कारणांसाठीं मिळविली जावी. शक्य तर तीसुद्धां आधीं अर्ज करून मिळवावी. तसें शक्य न झाल्यास आपल्या रजेबद्दल व ती किती काळ चालू ठेवणें जरूर पडण्याचा संभव आहे त्याची माहिती मॅनेजर यांना ताबडतोब लेखी वा तोंडी वा अन्य कोणा नोकरामार्फत कळवावी. हक्काची अगर तत्समान रजा मिळविण्यासाठीं नोकरानें कमीतकमी एक महिना आधीं अर्ज करावा. अशा अर्जाचा निर्णय मॅनेजरांनीं शक्य तितक्या त्वरित करावा. रजा मंजूर केल्यास ती सुरू होण्याच्या व संपण्याच्या तारखा नमूद करून तसा नोकरास हुकूम द्यावा. कामाची गर्दी वा ताण असेल तर मंजूर केलेली रजा तहकूब अथवा रद्द करतां येईल. रजा वाढवून पाहिजे असल्यास तत्संबंधी अर्ज शक्य तोंवर रजा संपण्यापूर्वी व अधिकाऱ्यांना सदर अर्ज मंजूर वा नामंजूर करून तो निर्णय कळविण्यास पुरेसा अवधी ठेवून पाठवावा व त्यांत नोकरानें आपला तत्कालिन पूर्ण व तारेचा पत्ता द्यावा. मूळ रजा संपण्यापूर्वी नोकराच्या हातांत पडणें शक्य असेल तर अधिकाऱ्यांनीं रजा वाढविण्याबाबतचा मंजुरी नामंजुरीचा निर्णय नोकरास त्यानें दिलेल्या पत्त्यावर लेखी कळवावा. रजेचे अर्ज नामंजूर केल्यास अथवा त्यावर निर्णय देणें लांबणीवर टाकल्यास ( पोस्टपोन ) तत्संबंधीचीं कारणें नमूद करण्यांत यावींत व तीं अर्जदारांस लेखी कळवावींत. ( अपूर्ण )

## सातारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना खुषखबर

### सातारा जि. सहकारी लँड मॉर्गेज बँकेची ४½% दरानें कर्जवाटणी

ता. १–१–१९४९ पासून जिल्ह्यांतील सर्व शेतकऱ्यांना ताली घालणेस, इंजीन इत्यादि शेतीउपयोगी यंत्रसामुग्री खरेदी करणेस किंवा नवीन विहिरी काढणेस बँकेकडून शेकडा ६ टक्क्यांऐवजी शे. ४½ नीं, १५ ते २० वर्षांच्या लांब मुदतीनें कर्ज देण्याचें ठरविण्यांत आलें आहे. तरी जिल्ह्यांतील शेतकरी बंधूंनीं या संधीचा अवश्य फायदा घ्यावा. गेल्या सहा महिन्यांत जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना जमीनखरेदी, इंजीनखरेदी, विहिरी काढणें इ. अनेक कामाकरितां रु. बावन्न हजार ( ५२,००० रु.) चें कर्ज वाटण्यांत आलें आहे.

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.